सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे

## आपत्ती व्यवस्थापन शाखा

दुरध्वनी क्र.020-26123371 E-Mail- homebranchpune@gmail.com

**वाचा :- १. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५**

************************************************************

**क्र.कक्ष/आ.व्य.प्र./1486/2020.**
**पुणे दिनांक :-07/06/2020.**

**विषय :-मावळ तालुक्यातील भुशी डॅम व इतर धरण परिसर येथे वर्षा पर्यटनासाठी येणा-या नागरिकांना प्रतिबंध करणेबाबत**

**आदेश**

**ज्याअर्थी,** आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

**ज्याअर्थी**, पुणे जिल्हयातील मावळ, मुळशी, हवेली, आंबेगाव, जुन्नर, भोर व वेल्हा या तालुक्यामध्ये सर्वात जास्त पाऊस होत असतो. त्यामुळे सदर तालुक्यात असणाऱ्या भुशी, मुळशी, भाटघर, खडकवासला धरण परिसरात मोठ्या प्रमाणात नागरीक वर्षापर्यटनांसाठी येत असतात. तसेच पाऊस सुरु झालेनंतर मुंबई व राज्याच्या इतर जिल्हयातून अनेक पर्यटक वर्षापर्यटनांसाठी पुणे जिल्ह्यातील तालुक्यांमध्ये येत असतात. यामध्ये प्रामुख्याने मावळ तालुक्यातील भुशी डॅम व लोणावळा परिसर, मुळशी तालुक्यातील मुळशी धरण व ताम्हीणी घाट परिसर, हवेली तालुक्यातील खडकवासला धरण, आंबेगाव तालुक्यातील भिमाशंकर, जुन्नर तालुक्यातील माळशेज घाट, भोर तालुक्यातील भाटघर धरण व गडकिल्ले परिसर व वेल्हा तालुक्यातील पानशेत धरण व परिसर येथे दर शनिवार, रविवार व सुट्टीच्या दिवशी मोठया प्रमाणात नागरीकांची गर्दी होते. यापुर्वी धरण परिसरात व इतर भागत नागरीकांच्या होणाऱ्या गर्दीमुळे पाण्यात बुडून तसेच पुराच्या पाण्यात वाहून जाऊन मयत होणाऱ्या व्यक्तींची संख्येत दरवर्षी वाढ होत आहे.

तसेच धरण क्षेत्रामध्ये मोठयाप्रमाणात पाऊस झाल्याने भुशी डॅम व इतर धरणातून खबरदारीचा उपाय म्हणून अचानक पाण्याचा विसर्गात वाढ होत असते. अचानक पाण्याच्या विसर्गात वाढ झाल्याने पाण्यात पर्यटक वाहून मयत होण्याच्या घटनामध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. तसेच अनेक पर्यटक यांचेकडून मद्यपान व हुल्लडबाजीच्या घटना देखील मोठ्या प्रमाणात घडलेल्या आहेत. त्यामुळे सदर ठिकाणी नागरीकांच्या प्रचंड गर्दीमुळे व इतर घटनांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे. या कारणामुळे मागील दोन वर्षामध्ये भुशी धरण व इतर धरणामध्ये बुडून जिवित हानी झालेली आहे. यावर्षी कोरोना आजाराच्या अनुषंगाने व नागरिकांच्या सुरक्षितेच्या दृष्टीकोणातून सदर ठिकाणी जाण्यास नागरीकांना बंदी घालणे आवश्यक आहे, अशी माझी धारणा झालेली आहे.

**त्याअर्थी मी, नवल किशोर राम, जिल्हाधिकारी पुणे तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे** आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम ३०(२)(३)(४) अन्वये जिल्हयात भविष्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये व नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने भुशी डॅम व इतर धरण परिसरामध्ये पर्यटनासाठी या आदेशाद्वारे बंदी करणेत येत आहे.

सदर आदेशाचा कोणतीही व्यक्ती/संस्था/संघटना यांनी उल्लंघन केल्यास ते आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ व भारतीय दंड संहिता १८६० च्या कलम १८८ नुसार दंडनिहाय/कायदेशीर कारवाईस पात्र राहतील.

जिल्हाधिकारी
पुणे

**(नवल किशोर राम)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**

**प्रति,**

१. पोलिस अधिक्षक, पुणे ग्रामीण, पुणे, योग्य त्या कार्यवाही आणि उपाययोजना करीता
२. उपविभागीय अधिकारी सर्व
३. तहसिलदार सर्व



Scanned with CamScanner